# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक क्र. १८१/२०२३

विषय :- विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत.

संदर्भ :- १. समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/भासशि/का-४ब/नस्ती क्र. ९१/२०२१/२०२१-२२/६८६, दि. ११/०२/२०२२.
२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ९०/२०२३ दि. २९/०५/२०२३
३. मा. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांचा दि. ३१/०७/२०२३ रोजीचा ईमेल

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था यांना विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये मा. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांच्या पत्राव्दारे प्राप्त यादीनुसार असे निदर्शनास येते की, बऱ्याच महाविद्यालयांनी अद्याप समान संधी केंद्राची स्थापना केलेली नाही.

सदर पत्राची प्रत या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेली असून उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था यांना कळविण्यात येते की, विहीत पध्दतीने Equal Opportunity Center (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांच्या पत्रानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

गणेशखिंड, पुणे -४११००७ )
जा.क्र. : आरक्षण/अे-२२/५४५ )
दिनांक : ११/०८/२०२३ )

डॉ. प्रफुल्ल अ. पवार
कुलसचिव

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-

१. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यता प्राप्त परिसंस्था, पुणे, अहमदनगर व नाशिक } आपणास निर्देशित करण्यात येते की, परिपत्रक महाविद्यालय/परिसंस्थेत दर्शनी भागात लावण्यात यावे. तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

Subject पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्र स्थापन करणेबाबत
From Assis.Commiss pune <acswopune@gmail.com>
To <regis@unipune.ac.in>
Date 2023-07-31 12:49

- मा.कुलसचिव.pdf (~751 KB)
- समान संधी केंद्र स्थापन न केलेल्या महाविद्यालयाची यादी.pdf (~554 KB)

*सहाय्यक आयुक्त, *
*समाज कल्याण पुणे *
*पत्ता :-*डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशन समोर, येरवडा पुणे ०६*
*Office Phone :- ०२० - २९७०६६११ *
E-Mail- acswopune@gmail.com

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ९० /२०२३

विषय : विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीकोणातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता **"Equal Opportunity Center"** (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत..

संदर्भ : समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/भासशि/का-४ब/नस्ती क्र. ९१/२०२१/२०२१-२२/६८६, दिनांक ११/०२/२०२२.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था यांना कळविण्यात येते की, मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता Equal Opportunity Centre (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

सदर आदेशाची प्रत या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेली असून उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये /परिसंस्था यांना कळविण्यात येते की, विहीत पध्दतीने Equal Opportunity Centre (समान संधी केंद्र) स्थापन करण्याबाबत मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

गणेशखिंड, पुणे-४११००७ )
जा. क्र. :आरक्षण/ ओ-२२/३५६ )
दिनांक: २९/०५/२०२३ )

डॉ. प्रफुल्ल अ. पवार
कुलसचिव

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-

१. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था पुणे, अहमदनगर व नाशिक } आपणास निर्देशित करण्यात येते की, परिपत्र महाविद्यालय/परिसंस्थेत दर्शनी भागात लावण्यात यावे. तसेच महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

E:\CBO\2023\Circular.docx

महाराष्ट्र शासन

# समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

दूरध्वनी क्र. : [illegible]

ई-मेल : [illegible]

क्र.सकआ/शिक्षण/भासशि/का-४व/नस्ती क्र. ९१/२०२१/२०२१-२२/ [illegible] दि. [illegible] /०२/२०२२

प्रति,

१) प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, पुणे.

२) सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे विभाग सर्व.

**विषय:** विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकास होण्याच्या दृष्टीकोणातून महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करणेबाबत...

**संदर्भ :** १) मा.मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगस्ट,२०२१ रोजी झालेली व्हीसीओ कॉन्फरन्स

२) आयुक्तालयाचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/भासशि/का-४व९१ .नस्ती क्र//२०२१/ २०२१-२२/४५८, दि .२८/०१/२०२२

वरील विषयी मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या व्हीसीओ कॉन्फरन्स बैठक व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती /फ्रीशिप इत्यादी योजना व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन स्वतंत्र उद्योजकता, व्यवसाय, रोजगार निर्मितीसाठी - आर्थिक न्यायासाठी मार्गदर्शन - संवाद अभियान तसेच युवा संवाद - कार्यक्रम सुरु करण्याकरीता महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करणे आवश्यक असल्याचे निर्देशित केले आहे.

त्याचप्रमाणे केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनामध्ये देखील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासह त्यांचे सर्वांगिन विकास व व्यवसाय / रोजगार निर्मिती च्या दृष्टीकोणातून राज्य शासनानी विशेष उपाययोजना करणेबाबत निर्देशित केले आहे.

त्या अनुरोधाने प्रत्येक महाविद्यालयात त्या त्या महाविद्यालयातील किमान एक प्राध्यापक व त्यांना सहाय्यक म्हणून काही विद्यार्थी यांची मदत घेऊन महाविद्यालयात Equal Opportunity Center" स्थापन करावेत व त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याची आवश्यकतानुसार रोजगार प्राप्तीसाठी किंवा उद्योजकता व व्यावसायिक होण्यासाठी कौशल्य शिक्षण या सर्व बाबींसह सर्वसमावेशक मार्गदर्शन करण्यात याकरिता याबाबतसदर उपक्रम प्रभावीरित्या राबविण्याकरीता महाविद्यालयातील "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) स्थापन करण्याकरीताचे सूचना, सदर केंद्रामार्फत कामकाज करण्याची कार्यपद्धती तसेच समान संधी केंद्राव्दारे करण्यात आलेल्या कामाचे संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय यांच्याशी करावयाचे समन्वय तसेच झालेल्या कामाचे मुल्यांकन इत्यादी बाबींचे धोरण विभागाव्दारे निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानुरोधाने सदरील उपक्रमाचे अभ्यास करुन धोरण निश्चित करणे याकरिता खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव, पदनाम व कार्यालय | | समितीतील पद |
| --- | --- | --- | --- |
| १) | श्री. बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे | : | अध्यक्ष |
| २) | श्रीमती. संगीता डावखर, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण पुणे | : | सदस्य |
| ३) | श्री. विशाल लोंढे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर | : | सदस्य |
| ४) | श्री. नितीन उबाळे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सातारा | : | सदस्य |
| ५) | श्री. जयंत चाचरकर, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली | : | सदस्य |
| ६) | श्री. कैलास आढे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर | : | सदस्य सचिव |

तरी उपरोक्त समितीने राज्यातील महाविद्यालयामध्ये स्थापन करण्यात येणाऱ्या "Equal Opportunity Center" (समान संधी केंद्र) याच्या कामकाजाबाबत सविस्तर धोरण निश्चित करणेबाबत स्वतंत्र अहवाल दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत समाज कल्याण आयुक्तालयास सादर करावा.

(डॉ. प्रशांत नारनवरे)
आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.
१) मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे खाजगी सचिव सहाय्यक,
२) मा. अपर मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

दूरध्वनी: (कार्यालय) : ०२० २६११४९४९
(निवास) : ०२० २६३६१८१८
जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, पुणे
११, फायनान्स रोड, पुणे - ४११ ००१.

डॉ. राजेश देशमुख
भा.प्र.से.
जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे

क्रमांक
पुणे, दिनांक

5357
31/7/2023
02-08-2023
Reservation

683
02/08/23

विषयः पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये "समान संधी केंद्र" स्थापन करणेबाबत.

संदर्भः १. मा. आयुक्त समाजकल्याण,म.रा. पुणे यांचे परिपत्रक क्र.४५८ दि.२८/०१/२०२२
२. मा. आयुक्त समाजकल्याण,म.रा. पुणे यांचे दि.३.२.२२ रोजीचे VC मधीलनिर्देश.
३. सहाय्यक आयुक्त, स.क. पुणे कार्यालयाचे पत्र क्र. ४६७ दि. ०४/०२/२०२२
४. स. आ.स.क. पुणे कार्यालयाचे पत्र क्र. ४९६ दि.०४/०२/२०२२ (प्रेसनोट)
५. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण पुणे या कार्यालयामार्फत आयोजित ऑनलाईन बैठक दि. २१.०२.२०२२
६. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण पुणे या कार्यालयामार्फत आयोजित ऑनलाईन बैठक दि.११.०५.२०२२
७. सहाय्यक आयुक्त, स.क. कार्यालयाचे आदेश जा. क्र. ४०९० दि.१९.०९.२०२२
८ .या कार्यालयाचे पत्र जा. क्र. ८४ दि. ०४/०१/२०२३

प्रिय श्री प्रफुल्लजी

प्रस्तुत विषयी संदर्भीय पत्रान्वये पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांना समान संधी केंद्र स्थापन करणेबाबत यापूर्वी या कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. तथापि पुणे जिल्ह्यातील सोबत जोडलेल्या यादीतील महाविद्यालयांनी अद्याप समान संधी केंद्राची स्थापना केलेली नाही.

समाज कल्याण आयुक्तालयाचे आदेश परिपत्रक क्र. ४५८ दि. २८/०१/२०२२ नुसार महाविद्यालयांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यासह इतर सर्व विद्यार्थ्याच्या अडीअडचणीचे महाविद्यालय स्तरावर निराकरण करण्याकरिता संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समिती स्थापन करण्यात आलेली असून महाविद्यालयातील विभागप्रमुख या समितीचे सदस्य सचिव आहेत. महाविद्यालयात स्थापन करण्यात येणाऱ्या सदरील समान संधी केंद्रात पुढील कामे महाविद्यालयाने करणे अपेक्षित आहे.

१. उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य व मार्गदर्शन करणे
२. उच्च शिक्षणाच्या संधी व उच्च शिक्षणासंदर्भातील क्षेत्रे
३. उद्योजकीय क्षेत्रे, त्याबाबतच्या संधी
४. संशोधन विषयक संधी व शिक्षणाचे क्षेत्र

AR - Res
Pl. discuss

५. सुधारात्मक प्रशिक्षण व योजना

६. महिला अभ्यास केंद्र संस्था व महाविद्यालय

७. लोकसंख्या शिक्षण विभाग

८. आर्टीफिशिअल इंटेलिजन्स

९. करिअर कट्टा, नोकरी मार्गदर्शन यांसारख्या उपक्रम हे समान संधी केंद्राची संलग्नित

१०. स्पर्धा परीक्षा

११. देश विदेशातील संधी

१२. कौशल्य विकास कार्यक्रम व योजना

१3. सोशल मिडीयाचा वापर (Telegram. WhatsApp. Twitter You Tube. Facebook)

१४.शासनाच्या विविध विभागांचे योजनाची माहिती

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयाने समान संधी केंद्र स्थापन करणे अपेक्षित होते. पण पुणे जिल्ह्यातील पत्रासोबत असलेल्या यादीतील महाविद्यालयांनी समान संधी केंद्र स्थापन न केल्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयांच्या निष्काळजीपणामुळे लाभ वेळेवर मिळत नाही. सदरील बाब भूषणावह नाही. त्यानुषंगाने आपणांस विनंती करण्यात येते की, पत्रासोबतच्या परिशिष्टामधील महाविद्यालयानी समान संधी केंद्र स्थापन करण्यास आपल्या स्तरावरून आदेशित करण्यात यावे. जी महाविद्यालये समान संधी केंद्र स्थापन करणार नाहीत, त्या महाविद्यालयाची विद्यापीठाची संलग्नीकरणता रद्द करण्याबाबत आपल्या स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी.

सोबत - समान संधी केंद्र स्थापन न केलेल्या महाविद्यालयांची यादी संलग्न.

आपला

डॉ.राजेश देशमुख

(भा.प्र.से.)

प्रति,

डॉ.श्री.प्रफुल्ल पवार

कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे